O/C
~~P-245~~
P-211


# नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग

**मध्यवर्ती कार्यालये, तळमजला, पुणे ४११ ००१**

**दूरध्वनी क्र.०२०-२६१२२०७६/२६१२९४९४**

**फॅक्स क्र.०२०-२६१२७०४१** **E-mail : ddtpurc_pune@rediffmail.com**


---

जा.क्रः विनिनि/ड वर्ग/कोल्हापूर/नासंघ/७०२० दि.३० /१२/२०१६

**प्रति,**

आयुक्त,
कोल्हापूर महानगरपालिका,
कोल्हापूर.

**विषय** :- कोल्हापूर महानगरपालिका – ड वर्ग महानगरपालिकांसाठीच्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्र.१(५) (Savings) खालील परंतुकाबाबत स्पष्टीकरण होऊन अंमलबजावणीबाबत मार्गदर्शन मिळणेबाबत.

**संदर्भ** :- १) शासन निर्णय क्र.टिपीएस १८१२/प्र.क्र.११२/१२/DCRD-D Class/ नवि-१३, दि.२९/०९/२०१६.
२) आपले पत्र क्र.नरविभाग/वशि – १/१५४९/२०१६-१७, दि.६.१०.२०१६.
३) आपले पत्र क्र.नरविभाग/वशि – १/१७०९/२०१६-१७, दि.३.११.२०१६.

विषयांकित प्रकरणी 'ड' वर्ग महानगरपालिकांच्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील विनियम क्र.१(५) – Savings च्या खालील परंतुकाबाबत स्पष्टीकरण होऊन मिळणेबाबत व अंमलबजावणीसाठी मार्गदर्शन होणेबाबत आपण संदर्भिय पत्र क्र.२ व ३ अन्वये केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने आपणास खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे :-

जुन्या नियमावलीतील ज्या कृतींना नविन नियमावलीचा अंमल देण्याच्या प्रयोजनार्थ, संरक्षण करण्याच्या विषयीच्या तरतूदींमधील 'Any action taken' यामध्ये नेमकी कोणती बाब अंतर्भूत/गृहीत धरावी याबाबत मार्गदर्शन अपेक्षिले आहे. पूर्वीच्या नियमावलीनुसार विकास परवानगीविषयी घेतलेली Any action म्हणजे महानगरपालिकेने विकास परवानगी मंजूर करण्याविषयी केलेली ठोस कृती होय. म्हणजेच महानगरपालिकेकडील अंतर्गत नस्तीवर विकास परवानगी मंजूरीचा निर्णय झाला आहे व त्यानुषंगाने संबंधित अर्जदारास मनपाकडून अधिकृतरित्या तशा आशयाचा कोणत्याही स्वरुपाचा पत्रव्यवहार (communication) झालेला असणे, अशी बाब ही उक्त विनियमातील "Any action taken" या वाक्यांशासाठी विचारात घेण्यात यावी.

आपला

(मसूदा मा.संचालक यांनी मंजूर केला आहे.)

२३ ३०/१२

(सुनिल मरळे)
संचालक नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे करिता

३०/१२/१६

प्रत :- १) सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे
२) सहायक संचालक, नगर रचना, कोल्हापूर शाखा, कोल्हापूर.

URC2/D/Varun/Letter/Letter December 2016